MHSO130003282018

# <u>निशाणी ३८ वर आदेश</u>

प्रतिवादी क्र.४ यांनी लेखी कैफीयत दाखल करणेसाठी झालेला विलंब माफ होऊन त्यांना लेखी कैफीयत दाखल करण्याची परवानगी देण्याची विनंती केली. त्यांचे असे म्हणणे आहे की प्रतिवादीकडुन दाव्याकामी आवश्यक ती माहिती व कागदपत्रे मिळणेस उशीर झाला त्यामुळे ते मुदतीत लेखी कैफीयत दाखल करु शकले नाहीत. सदरचा दावा स्थावर मिळकतीविषयी आहे, प्रतिवादीची कैफीयत अभिलेखावर न घेतल्यास त्यांचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे म्हणुन अर्ज मंजूर करण्याची विनंती केली. वादीने सदरचा अर्ज संयुक्तीक नाही, खरा नाही असे म्हणणे मांडले. तसेच अर्जास पुरेसे कारण नाही. सदरचा अर्ज हा मोघम असुन जाणिवपुर्वक प्रकरण लांबवण्यासाठी विलंबाने अर्ज केला आहे म्हणुन अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली.

०२. अभिलेखाचे अवलोकन केले. प्रतिवादी क्र.४ यांना वाद समन्स दिनांक १५/१२/२०२२ रोजी प्राप्त झाले. त्यानंतर दिनांक २३/१२/२०२२ रोजी प्रतिवादी क्र.४ दाव्यात हजर झाले. परंतु त्यांनी मुदतीत लेखी कैफीयत दिली नाही. प्रतिवादी क्र.४ यांनी दावा मिळकत दिनांक २३/०६/२०२१ रोजी खरेदी घेतल्यामुळे त्यांना दाव्यात प्रतिवादी म्हणुन सामील केले होते त्यामुळे सदर दाव्याच्या कामकाजाकरीता नैसर्गिक न्यायतत्वाच्या दृष्टीने प्रतिवादी क्र.४ यांचे म्हणणे ऐकुन घेणे गरजेचे आहे. प्रस्तुतचा दावा वादीने घोषणेचा व निरंतर ताकीदीसाठी दाखल केला आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र.४ यांची कैफीयत अभिलेखावर दाखल करुन न घेतल्यास त्यांचे कशानेही न भरुन येणारे नुकसान होणार आहे याउलट प्रतिवादीचे म्हणणे अभिलेखावर घेतल्यास दाव्याचा गुणदोषावर निकाल होण्यास मदत होणार आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र.४ यांची लेखी कैफीयत दाखल करुन त्यांना प्रकरण बचाव करण्याची संधी देणे गरजेचे आहे. प्रतिवादी क्र.४ यांनी लेखी कैफीयत देणेसाठी ७७ दिवसांचा विलंब केला. म्हणुन

सदरचा अर्ज ३००/- रुपयांच्या खर्चासह मंजुर करण्यात येत आहे. प्रतिवादी यांनी सदरचा खर्च पुढील तारखेच्या आत वादीला दयावा. सदरचा खर्च वादीला दिल्यानंतरच प्रतिवादी यांची लेखी कैफीयत अभिलेखावर घेण्यात यावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by Santosh Bholaram Vijaykar
Date: 2023.08.17 17:53:05 +0530

बार्शी (एस.बी. विजयकर)
दिनांकः १७/०८/२०२३ सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), बार्शी.

# **CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | : | S.R. Barangule |
| (b) | Court | : | S.B.Vijaykar, Jt.C.J.J.D.&J.M.F.C. Barshi. |
| (c) | Judgment /Order signed by P.O. on | : | 17/08/2023 |
| (d) | Judgment /Order uploaded on | : | 17/08/2023 |